**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया**
**ई-निविदा प्रणाली अंतर्गत ई-निविदा प्रसिध्द करणे**
**सुचना क्र. ०३ (सन २०२६-२७) प्रथम वेळ (खुला प्रवर्ग)**
**खुला प्रवर्ग यांचेकडून ई-निविदा मागविण्याबाबत.**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालया अंतर्गत मंजूर कामांचे पपत्र बी-१ मध्ये दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा महाराष्ट्र शासना चे जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया येथे नोंदणीकृत कंत्राटदार खुला प्रवर्ग यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. प्रसिध्द कामांची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे. या निविदेमधिल कामाबाबत अटी व शर्ती ई. संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in यासंकेतस्थळावर सविस्तर निविदा प्रसिध्द दिनांक 11/05/26 पासून पाहण्यास उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषद, बांधकाम विभाग गोंदिया चे नोटीस बोर्डवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबतचे सर्व शुध्दिपत्रके सुध्दा वरिल संकेतस्थळावरच प्रसिध्द करण्यात येतील.

**ई-निविदा पध्दतीचा तपशिल**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दिनांक:- 11/05/26 **पासुन** |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ (Start) | दिनांक:- 11/05/26 **सकाळी ११.००** |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त (End) | दिनांक:- 25/05/26 **चे सायं. ५.०० वाजेपर्यंत.** |
| ऑनलाईन निविदा उघडणे. (शक्य झाल्यास) | कार्यकारी अभियंता जि.प. सा.बा. विभाग गोंदिया यांचे कक्षात संबंधित निविदाधारकांचे समक्ष **दिनांक:-** 26/05/26 रोजी **५.३० वाजेपासुन** लिफाफा क्रमांक-१ उघडण्यात येईल. **(शक्य झाल्यास)** |

दिनांक -

(प्रकाश ताकसांडे)
कार्यकारी अभियंता,
जि.प. सा.बा. विभाग, गोंदिया

(जनार्दन खोटरे)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

(डॉ.तमाजी लोखंडे)
अति मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया

**कार्यालय :- जिल्हा परिषद बांधकाम विभाग, गोंदिया**

**ई-निविदा प्रणाली अंतर्गत ई-निविदा**

**सुचना ०३ (सन २०२६-२७) प्रथम वेळ**

**(खुला प्रवर्गा कडून ई-निविदा मागविण्याबाबत)**

जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, गोंदिया या कार्यालया अंतर्गत, ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा-७ दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ अन्वये खालील कामांचे प्रपत्र बी-१ मध्ये दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा व्दारे जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभागा मध्ये नोंदणीकृत केलेल्या योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार (खुला प्रवर्ग ) या प्रवर्गाकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामांची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे. निविदेच्या सविस्तर अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द **दिनांक ११/०५/२०२६** पासून पाहण्यास उपलब्ध आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव व तालुका | तालुका | कामाची श्येडयुल बी प्रमाणे किंमत | | | निविदेसोबत भरावयाची बयाना रक्कम (१ टक्के) | निविदा स्वीकृत झाल्यास सुरक्षा ठेव रक्कम (२ टक्के) | निविदा ब-१ फार्मची किंमत रुपये | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भाग-१ | भाग-२ | एकूण | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | **लेखाशिर्ष - जिल्हा वार्षिक योजना पशुवैद्यकिय दवाखाना बाधंकाम** | | | | | | | | | | |
| १ | पशुवैदयकिय दवाखाना श्रेणी - २ इंदोरा येथे पशुवैकीय दवाखान्याच्या नविन इमारतीचे बांधकाम करणे, ता. गोंदिया | तिरोडा | ४५५४९१५ | ८६५४३४ | ५४२०३४९ | ५४२०३ | १०८४०७ | १०००/- +जीएसटी | ३०० दिवस | वर्ग ४ अ पर्यंत | |
| २ | पशुवैदयकिय दवाखाना श्रेणी - २ वडेगांव स्टे. येथे पशुवैकीय दवाखान्याच्या नविन इमारतीचे बांधकाम करणे, ता. अर्जुनी/मोर | अर्जुनी/मोर | ५०६३३५७ | ९४२३९८ | ६००५७५५ | ६००५८ | १२०११५ | १०००/- +जीएसटी | ३०० दिवस | वर्ग ४ अ पर्यंत | |
| | **लेखाशिर्ष - जिल्हा वार्षिक योजना ३०५४-३५४२ इतर जिल्हा मार्ग विकास कार्यक्रम (सर्व)** | | | | | | | | | | |
| ३ | अंभोरा केशोरी धानोली रस्त्यावर पुल बांधकाम करणे सा.क्र. ४/०० ते ५/०० इजिमा - १०६ | देवरी | ५८३३१८६ | ११०८३०५ | ६९४१४९१ | ६९४१५ | १३८८३० | १०००/- +जीएसटी | ३०० दिवस | वर्ग ४ अ पर्यंत | |
| | | | | | ११४२६१०४ | | | | | | |

**ई-निविदा पध्दतीचा तपशिल**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दिनांक :- ११/०५/२०२६ पासून |

| | |
|---|---|
| ई- निविदा दस्ताऐवज स्विकारणे प्रारंभ करण्याचा दिनांक (Start) | दिनांक :- ११/०५/२०२६ सकाळी ११.०० वाजेपासून |
| ई-निविदा दस्ताऐवज स्विकारणे समाप्तीचा दिनांक (End) | दिनांक :- २५/०५/२०२६ चे सायं. ५.०० वाजेपर्यंत. |
| ऑनलाईन निविदा उघडणे (शक्य झाल्यास). | कार्यकारी अभियंता जि.प.सा.बां. विभाग गोंदिया यांचे कक्षात संबधित निविदा धारकांचे समक्ष दिनांक २६/०५/२०२६ रोजी दुपारी ५.३० वाजेपासून लिफाफा क्रमांक-१ उघडण्यात येईल. ( शक्य झाल्यास) |

**निविदेच्या अटी व शर्ती:-**

१ जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, गोंदिया येथे नोंदणीकृत कंत्राटदारांनाच सदर ई-निविदा मध्ये भाग घेता येईल. इतर कंत्राटदारांना भाग घेता येणार नाही.

२ कंत्राटदार कोणत्याही शासकिय/निमशासकिय सेवेत/खाजगी संस्थेत कार्यरत नाही. तसेच काळया यादीत नांव नसल्याचे तसेच कोणत्याही जिल्हा परिषदेच्या सेवेशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे व निविदेमध्ये जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे रु. ५००/- चे स्टँम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करण्यात यावा. चालु आर्थिक वर्षातील

३ निविदेच्या अटि व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल. ई-निविदा सादर करण्यासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांनी डि.एस.सी. प्राप्त करुन घेऊन महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर स्वत: नोंदणी करुन केवळ ई-निविदा पध्दतीने निविदा सादर करावी.

४ ई-निविदा पोर्टलवर बिड लॉक झाल्यानंतर निविदांबाबत हार्ड कॉपी एका प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात बंद लिफाफयात कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे. तसेच निविदा उघडण्याच्या दिवसी कंत्राटदारांनी मुळ कागदपत्रासह कार्यालयात हजर राहावे.

५ शासन निर्णय दिनांक १२/४/२०१७ तसेच शासन निर्णय शुध्दीपत्रक दिनांक २९/६/२०१७ नुसार रु.१.५० कोटी पर्यंतच्या कामांसाठी संयुक्त अभियानासह स्थापित अभिकरण (Joint Venture Consortium) लागू

६ निविदाकारास निविदा भरण्यापूर्वी प्रत्यक्ष बांधकामाच्या टिकाणी जावून भेट देणे तसेच सदर टिकाणी बांधकामाचे साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणार असल्याबाबतचा अहवाल (Site Visit Report) फोटोग्राप्ससह सादर करणे आवश्यक राहिल. त्या करीता १४/०५/२०२६ ला गोंदिया उप विभगाकरीता श्री शैलेश गायधने उप अभियंता सा.बा. उपविभाग गोंदिया यांचे दुरध्वनी क्र. ९४२१९९३३६४ वर संपर्क साधावा. तसचे सडक/अर्जुनी उप विभगाकरीता साठी श्री किशोर बन्सोड उप अभियंता सा.बा. उपविभाग सडक/अर्जुनी यांचे दुरध्वनी क्र. ९४०५६१३२३६ वर संपर्क साधावा.

७ संबंधित निविदा धारकांचा लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L१ निविदाकाराचा निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १० % पर्यंत कमी दराचा असेल तर त्या निविदाकाराने निविदाधीन किमंतीच्या १ % एवढया रक्कमेचा बैंक प्रतिभूती (Bank Guarantee) किंवा धनाकर्ष (Demand Draft) किंवा एफडीआर ॲडीशनल परफॉर्मन्स सिक्युरीटी डिपॉझीट म्हणुन आठ दिवसाच्या आत कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा.विभाग, गोंदिया येथे सादर करावे. कोणत्याही कारणासाठी ८ दिवसाची मुदत शिथिलक्षम राहणार नाही. ( उदा. १ % ते १० % कमी दर - १% रक्कम)

८ तसेच शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे निर्णय दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ मधिल मुद्या क्र. ३ प्रमाणे देकार १५ टक्के पेक्षा अधिकच्या कमी दराचा असल्यास उर्वरीत रकमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.व्दारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा.१९ टक्के कमी दरासाठी पुढिलप्रमाणे पृथ:करण राहील, i) १० टक्के कमी दरापर्यंत १ टक्के व ii) १५ टक्के कमी दरापर्यंत - (१५टक्के -१०टक्के=५टक्के) तसेच iii) (१९-१५) =४टक्के करीता (४x२=) ८ टक्के असे एकूण (१+५+८)=१४ टक्के रक्कम संबंधित निविदा धारकांचा लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L१ निविदाकारास धनाकर्ष (Demand Draft) बी.जी./एफडीआर ॲडीशनल परफॉर्मन्स सिक्युरीटी डिपॉझीट म्हणुन आठ दिवसाच्या आत कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा.विभाग, गोंदिया येथे सादर करावी लागेल. सदर बाब उदाहरणादाखल देण्यात आली असून १९ टक्केच्या वर कमी दराचा देकार सादर केल्यास त्याप्रमाणे डी.डी./बी.जी./एफ.डी.आर. सादर करावे लागेल. सदर डी.डी./बी.जी. /एफ.डी.आर. सादर करण्यासाठी ८ दिवसाची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथिलक्षम राहणार नाही.

९ सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय दिनांक २६ नोव्हेंबर,२०१८ नुसार रिट पीटीशन क्र.५२४४/२०१८ मधिल अंतिम निकाल दि.६ सप्टेंबर,२०१८ रोजी देण्यात आला असून, त्यामध्ये, निविदाकाराने अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ऑनलाईन पध्दतीने सादर न केल्याने निविदेच्या आवश्यक तरतूदींचा भंग होत नसल्याचे मा.उच्च न्यायालयाने नमूद केल्याचे उल्लेखीत आहे. यावरुन निविदाकाराने त्यांनी दाखल केलेली निविदा ही १ टक्के पेक्षा अधिकच्या कमी दराने सादर केली असल्यास वरिल मुद्दा क्र.६ व ७ प्रमाणे डीडी/एफडीआर/बँक प्रतिभुती प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L१ निविदाकारास आठ दिवसाच्या आत कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

१० प्रथम न्यूनतम देकाराच्या (L१) निविदाकाराने विहित मुदतीत Additional Performance Security Deposit चा भरणा केला नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या (L२) निविदाकारास लेखी विचारणा करुन ते L१ पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करण्यात येईल.

११ कंत्राटदारानी निविदा फी इसारा फी (बयाना रक्कम) NEFT or Internet Banking व्दारे **मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.गोंदिया Bank A\C : ३४०२७५७४७४५ IFSC:SBIN०००००३७६** मध्ये शुल्क (Internet Banking) व्दारे भरल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र (as a part of e-tendering document & process) तांत्रिक लिफाफा सोबत अपलोड करण्यात यावे.

१२ कंत्राटदारांनी निविदा भरतांना फक्त Schedule-B मधील भाग क्र.१ (Civil Work) निविदा किंमतीवर कमी/अधिक दर नमुद करावे.

१३ **सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय दि.१७/९/२०१९ नुसार रु.३.०० लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदांमध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करावी, असे नमुद होते. आता सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय दिनांक ११/५/२०२२ नुसार रु.३०.०० लक्ष वरील सर्व कामांसाठी बिड कॅपीसीटी आवश्यक आहे. यामुळे बीड कॅपिसिटी ची माहिती सादर करणे आवश्यक राहिल. तसेच सदर शासन निर्णयातील इतर अटी सुध्दा लागू राहतील.**

१४ **शासन निर्णय दिनांक २५/१०/२०१९ मध्ये नमुद पोस्ट क्वालिफिकेशन क्रायटेरियाबाबत सुधारित तरतुदीनुसार निविदा सादर करावी, तशी माहिती लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे आवश्यक राहिल. तसेच कंत्राटदाराकडे उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाची यादी व यंत्र सामुग्रीची यादी चे संबंधित दस्ताऐवज निविदेसोबत सादर करावे.**

१५ सर्वप्रथम निविदा शुल्क जमा झाल्याची खात्री झाल्यानंतरच तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल.

१६ तांत्रिक लिफाफा क्र. १ मध्ये नोंदणीकृत कंत्राटदारांचे i) पंजीयन प्रमाणपत्र अद्यावत ii ) व्यवसाय कराचे क्लिअरन्स प्रमाणपत्र (सन २०२५-२६ चे ) iii) वस्तू व सेवा कर पंजीयन प्रमाणपत्र vi) आयकर रिटर्न दस्ताऐवज प्रमाणपत्र सलग तिन वर्षाचे (सन २०२५-२६ चे अद्यावत AY २०२५-२६ पर्यंतचे) v) अ.क्र. ६ ते १६ मध्ये उल्लेखीत व संबंधित असलेले दस्तावेज अपलोड करण्यात यावे. सदर कागदपत्रे उघल्यानंतर पात्र निविदा धारकांचे निविदांचा दराबाबतचा आर्थिक लिफाफा क्रमांक २ उघण्यात येईल. तसेच वस्तू व सेवाकर कायदा सन २०१७ अंतर्गत नोंदणी करुन कंत्राटदारास तसे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

१७ कामाचे देयकातून शासन निर्णयानुसार योग्य कर (इन्कम टॅक्स, जीएसटी, रॉयल्टी, इंन्शुरन्स, सुरक्षा राशी इ.) इत्यादी कपात करण्यात येईल. काम पूर्ण झाल्याचे दिनांकापासून (C.C.Date) काम समाधानकारक असल्यास कपात केलेली सुरक्षा ठेवीची राशी २४ महिण्याचे नंतर ( Defect Liability Period) संपल्यानंतर (सा.बा.विभागाचे शा.नि.दिनांक १४/१/२०१९) अथवा संबधीत आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर सुरक्षा राशी परत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१८ **कार्यरंभ आदेशाचे दिनांका पासून ठरलेल्या मुदतीत काम पूर्ण करणे बंधनकारक असल्याने सर्वसाधारण परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व तसे आवश्यक पुरावे कंत्राटदाराने सादर केल्यास नियमानुसार दंड आकारुन मुदतवाढ देता येईल.**

१९ कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा व ती कामे पूर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांचा शासकिय विमा अधिकृत विमा कंपनी कडून काढणे बंधनकारक राहिल. अन्यथा विम्याची रक्कम देयकातून कपात करण्यात येईल.

२० कामाचे देयके शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या अनुदानाचे अधिन राहून देयके अदा करण्यात येईल.

२१ बाजार दरातील तफावतीनुसार वाढीव दर अनुज्ञेय राहणार नाही (price excalation).

२२ जीएसटीची अंमलबजावणी दिनांक १ जुलै, २०१७ पासून सुरु करण्यात आली आहे. जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे शासकिय कंत्राटावर कराच्या बदललेल्या कररचनेमुळे परिणाम होणार आहे. निविदा धारकांनी दि.१/७/२०१७ नंतर लागू झालेल्या GST कराचा बोजाचा विचार करुन निविदा दर सादर करावे. यासंदर्भात i) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र:जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१ दि. १९ ऑगष्ट, २०१७, ii) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र:जीएसटी-१०१७/प्र.क्र.१५५/कराधान-१ दि. ११ सप्टेंबर, २०१७ iii) सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन परीपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/C.R.१२१ (Part-II) दि. १९/९/२०१७ व iv) शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-२०१७/C.R.१२१(II)/Bld-२ दि.४/९/२०१७ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना v) शासनाचे परिपत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ८४/बांधकाम -४ दि. २४ मार्च २०२३ अन्वये व त्यानुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणारे शासन पत्र/निर्णय/परीपत्रक सर्व सबंधित कंत्राटदारांना लागू राहतील. याची सर्व सबंधितांनी नोंद घ्यावी.

२३ या निविदेची सर्व कार्यवाही व शुध्दीपत्रके महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध राहतील.

२४ कोणत्याही स्तरावर, कोणतेही कारण न देता सदर ई-निविदा रद्य करण्याचे किंवा स्विकारण्याचे अधिकार अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहे.

दिनांक :-

प्रत :- सुचना फलक

(प्रकाश ताकसांडे)
कार्यकारी अभियंता,
जि.प.सा.बा.विभाग, गोंदिया

(जनार्दन खोटरे)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

(डॉ. तानाजी लोखंडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया

Signature Not Verified
Digitally signed by Prakash Ramdas Taksande
Date: 2026.05.09 22:51:21 IST
Location: Maharashtra-MH